Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १०]  गुरुवार ते बुधवार, एप्रिल १५-२१, २०२१/चैत्र २५-वैशाख १, शके १९४३  [पृष्ठे ५, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्र.डि.टी.पी.-वि.यो.चिखली (सु.)-आ.क्र.५९-कलम ५०-टिपीव्ही-६-१७११-२०२१.—

ज्याअर्थी, चिखली या ' ब ' वर्ग नगर परिषदेची मूळ हद्दीची सुधारीत विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२६००-१०२-प्र.क्र.१८बी-२०००-नवि-३०, दिनांक २५-०९-२००३ अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक १०-११-२००३ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे " उक्त विकास योजना " म्हणून संबोधिलेले आहे) ; आणि उक्त विकास योजनेसाठी चिखली नगर परिषद, चिखली हे नियोजन प्राधिकरण आहे. (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, आरक्षण क्र. ५९ ' स्टेडियम ', क्षेत्र ८.२५ हे. (यापुढे " उक्त आरक्षण " असे संबोधिलेले आहे) यासाठी आरक्षित आहे आणि उक्त आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण जिल्हा क्रिडा अधिकारी, बुलडाणा (यापुढे " उक्त समुचित प्राधिकरण " असे संबोधिलेले आहे) हे आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने त्यांचेकडील पत्र क्र. १९८९/२०१६, दिनांक ११ मार्च २०१६ अन्वये, चिखली या गावातील स.क्र. स.नं. १४५ (भाग), १४७ (भाग) व १२० (भाग) या जमिनीमधील उक्त आरक्षणाने बाधित होणारी ८.२५ हे. जागा उक्त आरक्षणातून वगळण्याचा प्रस्ताव उक्त अधिनियमाचे कलम ५० अन्वये संचालनालयास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने ठराव क्र. २२, दिनांक २९-०७-२००६ अन्वये उक्त समुचित प्राधिकरणाने नाहरकत प्रमाणपत्र दिल्यास उक्त आरक्षण वगळण्यास मंजुरी प्रदान केली आहे ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, चिखली यांनी त्यांचेकडील पत्र क्र. २५२/२०१७, दिनांक २७ जानेवारी २०१७ सोबत उक्त नियोजन प्राधिकरणाचा वर नमूद ठराव जोडून उक्त आरक्षण वगळण्यास नगर परिषद कार्यालयाची कोणतीही हरकत नसल्याचे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, क्रिडा विभागाकडे स्टेडियमसाठी जागा खरेदी करण्याकरीता कोणतीही तरतूद नाही आणि एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकत नाही आणि तेथे जिल्हा परिषदेच्या २.१३ हे. जागेवर यापूर्वी एक तालुका क्रिडा संकुल विकसित केलेले आहे आणि म्हणून उक्त

आरक्षणाच्या जागेची आवश्यकता राहिलेली नसल्याबाबत उक्त समुचित प्राधिकरणाने नाहरकत प्रमाणपत्र देऊन, उक्त आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव पत्र क्र. १९८९/२०१६, दिनांक ११ मार्च २०१६ अन्वये संचालनालयास सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाची उक्त समुचित प्राधिकरणास यापुढे आवश्यकता नसल्याचे आता स्पष्ट होत असल्यामुळे उक्त आरक्षणाखालील जमीन उक्त अधिनियमाच्या कलम ५० (२) अन्वये वगळण्यास तत्वतः मान्यता देण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाच्या ८.२५ हे. जागेपैकी ४२४०० चौ.मी. क्षेत्राच्या जमिनी पुरते उक्त आरक्षण भागशः वगळण्याबाबत यापूर्वी मंजुरी देऊन उक्त अधिनियमाच्या कलम ५० (२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्र.डि.टी.पी.-वि.यो.चिखली (सु.)/ आ.क्र.५९/कलम ५०/टिपीव्ही-६/५९१, दिनांक २९ जानेवारी २०१९ अन्वये आदेश पारित केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, बुलडाणा शाखा यांनी त्यांचेकडील पत्र क्र. २०८१, दिनांक २३ ऑक्टोबर २०२० अन्वये शासनाच्या दिनांक २० एप्रिल २०१६ रोजीच्या शासन निदेशानुसार उक्त आरक्षणाच्या चिखली या गावातील स.नं. १४५ (भाग) या जमिनीमधील १६४०० चौ.मी. क्षेत्राचे (यापुढे " उक्त जागा " असे संबोधिलेले आहे) जमीन मालक श्री. गजानन उखर्डा वाघ व इतर यांनी (यापुढे " उक्त जमीन मालक " असे संबोधिलेले आहे) सन २०१७-१८ च्या बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणा-या जमीन मूल्याच्या ५ % दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी ५० % शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम शासकीय कोषागारात आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५० % अधिमूल्याची रक्कम मुख्याधिकारी, नगर परिषद, चिखली यांचे खाती जमा केले असल्याचे संचालनालयास कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या उक्त जमीन मालकांनी उक्त जागेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणा-या जमीन मूल्याच्या ५ % दराने येणारी अधिमूल्याची रक्कम, सन २०२०-२१ मध्ये जमा केली असली तरी, उक्त जागेचा सन २०१७-१८ व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षांकरीता बाजारमूल्य दर तक्त्यामधील जमीन दरात बदल होत नाही आणि म्हणून अधिमूल्याची रक्कम सारखीच राहात आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये सर्व नगर परिषदा/नगर पंचायती आणि नियोजन प्राधिकरण म्हणून जिल्हा परिषदेने हाती घेतलेल्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम ५० (२) खालील अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ५० (२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, याद्वारे उक्त जमिनींपुरते उक्त आरक्षण उक्त विकास योजनेच्या भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे भागशः वगळण्यास मंजुरी देत आहेत आणि त्यासाठी दिनांक २५ सप्टेंबर २००३ अन्वये मंजूर केलेल्या उक्त विकास योजनेच्या अधिसूचनेमध्ये खालील परिशिष्टात दिल्याप्रमाणे सुधारणा करीत आहेत.

उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनेच्या शेवटच्या नोंदी नंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :—

**परिशिष्ट**

| अ.क्र. | गाव, तालुका व जिल्हा | उक्त विकास योजनेतील आरक्षण व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त जागेचा तपशिल | आरक्षणातून भागशः वगळण्यात आलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | गाव चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा. | आ.क्र. ५९, (स्टेडियम) क्षेत्र ८.२५ हे. | स.नं. १४५ (भाग) | आ.क्र. ५९ चे १६४०० चौ.मी. क्षेत्र |

**टीप :** (१) शासनाच्या दिनांक २० एप्रिल २०१६ रोजीच्या शासन निदेशानुसार उक्त आरक्षणाखालील उर्वरीत २३७०० चौ.मी. क्षेत्राच्या संबंधित जमीन धारकांनी ५% अधिमूल्याची रक्कम जमा केल्यानंतर त्यांचे जागेवरील उक्त आरक्षण वगळणेबाबत आदेश पारित करण्यात येतील.

(२) वरील बदल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा चिखली नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात येईल.

(३) सदर आदेश संचालनालयाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात येईल.

**सुधाकर नांगनुरे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ३० मार्च २०२१.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३.

BY DIRECTOR, TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P.-D.P. Chikhali(R)-Reservation No. 59-Sec 50-TPV-6-1711-2021.—

Whereas, the Revised Development Plan of original limit of ' B ' class Municipal Council, Chikhali has been sanctioned under Section 31(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2600-102-CR-18B-2000-UD-30, dated 25th September 2003 and came into force with effect from 10th November 2003 (hereinafter referred to as " the said Development Plan "; and the Chikhali Municipal Council is Planning Authority (hereinafter referred to as " the said Planning Authority ") for said Development Plan ;

And whereas, in the said Development Plan, Reservation No. 59 is reserved for " Stadium " admeasuring area 8.25 Ha. (hereinafter referred to as " the said Reservation ") and " District Sports Officer, Buldana " is the Appropriate Authority for the said reservation. (hereinafter referred to as " the said Appropriate Authority ");

And whereas, the said Appropriate Athority *vide* its letter No. 1989/2016, dated 11th March 2016 has submitted the proposal of deletion of the land affected by the said reservation admeasuring 8.25 Ha. from S. No. 145 (Part), 147 (Part) & 120 (Part) of village Chikhali from the said reservation under Section 50 of the said Act to the Directorate ;

And whereas, the said Planning Authority has given approval for deletion of the said reservation subject to condition of obtaining no objection certificate from the said Appropriate Authority *vide* resolution No. 22, dated 29th July 2006 ;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Chikhali *vide* his letter No. 252/2017, dated 27th January 2017 has communicated alongwith the above mentioned resolution that, the office of the Municipal Council has no objection for deletion of the said reservation ;

And whereas, the Sports Department have no provision for purchasing the land for Stadium and such a large amount of funds can not be available and there one Taluka Krida Sankul is already developed on Zilla Parishad land admeasuring 2.13 Ha. and hence the said Appropriate Authority has submitted the proposal for deletion of the said reservation alongwith No Objection Certificate of no requirment of the land of the said reservation to the Directorate *vide* its letter No. 1989/2016, dated 11th March 2016 ;

And whereas, it is now clear that the land under the said reservation is no longer required to the said Appropriate Authority and the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that the deletion of the reservation under Section 50(*2*) of the said Act should be principally approved ;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has already given sanction for part deletion of land area admeasuring 42400 Sq. m. out of 8.25 Ha. of the said reservation and issued order under Section 50(*2*) of the said Act, *vide* order No. D.T.P.-D.P.Chikhali(R)-Reservation No. 59-Sec 50-TPV-6-591, dated 29th January 2019 ;

And whereas, Assistant Director of Town Planning, Buldana Branch by its letter No. 2081, dated 23rd October 2020 communicated that, as per the Government directives dated 20th April 2016 out of the 5% of amount of premium, the land owners of the land bearing S. No. 145 (Part) of village Chikhali, area admeasuring 16400 Sq. m. of the said reservation (hereinafter referred to as " the said land ") Shri. Gajanan Ukharda Wagh and others (hereinafter referred to as "the said land owners") have deposited 50% amount due to Government into the Government Treasury and 50% amount due to the Planning Authority into the accounts of Chief Officer, Chikhali Municipal Council at the land rates in Annual Statement of Rates (ASR) of the year 2017-18 ;

And whereas, though the said land owners have deposited 5% premium amount of the land value of the said land, as per the land rate prescribed in the Annual Statement of Rates for the year 2017-18 in the year 2020-21, there is no change in the land rate of the said land prescribed in the Annual Statement of Rates for the year 2017-18 & 2020-21 and hence premium amount remains same ;

And whereas, the Government in Urban Development Department, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01st December 2016 has delegated the powers exercisable by it under Section 50(*2*) of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune in respect of Development Plans of all Municipal Councils/Nagar Panchayat and for the development plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority ;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby sanctions the part deletion of the said reservation in respect of the said land as shown in the part plan of the sanctioned said Development Plan u/s 50(*2*) of the said Act and for that purpose amends the notification of the said Development Plan, sanctioned dated 25th September 2003 as specified in the Schedule herein below :–

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :–

SCHEDULE

| Sr. No. | Village, Taluka, Dist. | Reservation in the said Development Plan & its approximate area as per D.P. Report | Description of the Land | Part Area deleted from the reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Village Chikhali, Taluka Chikhali, Dist. Buldana. | Site No. 59 " Stadium " Area 8.25 Ha. | S. No. 145 (Part) | 16400 Sq. m. area of Site No. 59. |

*Note* :(1) The order in respect of remaining part of the said reservation admeasuring 23700 Sq. m. will be issued after the payment of 5% amount of premium from the respective owners as per the Government directives dated 20th April 2016.

(2) A copy of the Part Plan of the said Development Plan showing the aforesaid Modification will be made available for inspection in the office of Municipal Council, Chikhali during office hours on all working days.

(3) This Order will also be published on the Directorate website www.dtp.maharashtra.gov.in.

SUDHAKAR NANGNURE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 30th March 2021.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३४.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

### आदेश

क्रमांक कक्ष-२०-नविशा-कर व प्रशा-आस्था-कावि-२३४-२०२१.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ (४) मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, शैलेश नवाल, जिल्हाधिकारी, अमरावती या प्रगटनाद्वारे जाहीर करतो की, दिनांक २३ मार्च २०२१ रोजी अमरावती जिल्ह्यातील वरूड या नगर परिषदेच्या रिक्त उपाध्यक्ष पदासाठी न. प. सदस्यांमधून घेण्यात आलेल्या निवडणुकीमध्ये खालील अनुसूचीचे स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या नगर परिषदेत त्यांच्या नावासमोर स्तंभ (३) मध्ये नमूद केलेले उमेदवार उपाध्यक्ष म्हणून निवडून आलेले आहेत.

### अनुसूची

| अ. क्र. | नगर परिषदेचे नाव | निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नाव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | वरुड | श्री. देवेंद्र भाऊरावजी बोडखे |

**शैलेश नवाल** (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी,
अमरावती.

अमरावती :
दिनांक २४ मार्च २०२१.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३५.

BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-20-TDB-T&A-ESTA-WS-234-2021.--

In exercise of the power under Section 51-1A(*4*) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayat* & Industrial Townships Act, 1965. I, Shailesh Nawal, (I.A.S.) Collector, Amravati hearby publish Name of Vice President of Nagar Parishad, Warud for which the election have been held on date 23rd March 2021 as shown below Schedule in Col. No. (3) is elected for the Nagar Parishad shown in Col. No. (2).

SCHEDULE

| Sr. No. | Name of Municipal Council | Name of Vice President who is elected |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Warud | Shri. Devendra Bhauraoji Bodkhe |

Amravati :
Dated the 24th March 2021.

SHAILESH NAWAL (I.A.S.),
Collector,
Amravati.

अ.-एक-अ-२ (१५१२).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.